# अक्षर वाङ्मय

वर्ष तेरावे, पुरवणी अंक ४, खंड. ३

फेब्रुवारी २०२३



मुख्य संपादक

डॉ. नानासाहेब सुर्यवंशी

आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I)
Peer Reviewed Journal

# अक्षर वाङ्मय

**वर्ष तेरावे, पुरवणी अंक ४, खंड. ३**

**फेब्रुवारी २०२३**

संपादक
**डॉ. नानासाहेब सूर्यवंशी**

**कार्यकारी संपादक**
डॉ. शिवाजीराव देशमुख

प्रकाशक : सौ. रेखाताई नानासाहेब सूर्यवंशी, प्रतीक प्रकाशन
'प्रणव' रुक्मिणी नगर, थोडगा रोड, अहमदपूर ४१३५१५
मुद्रक: श्री. जे प्रिंटिंग प्रा लिमिटेड १४१६ सदाशिव पेठ पुणे- ४११०३०
**साहित्य व वर्गणी पाठवण्याचा पत्ता**: डॉ. नानासाहेब सूर्यवंशी
'प्रणव' रुक्मिणी नगर, थोडगा रोड, अहमदपूर,
जि. लातूर, ४१३५१५
E-mail : suryawanshinanasaheb67@gmail.com

वार्षिक वर्गणी: रु ५००/-
द्विवार्षिक वर्गणी : रु ९००/-
पंचवार्षिक वर्गणी : रु २०००/-
अंक मूल्य : रु १२५/-

- महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ या नियतकालकाच्या प्रकाशनात अनुदान दिले असले तरी या नियतकालिकेतील लेख लेखांच्या विचाराशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

- या अंकातील लेखातून व्यक्त झालेले लेखकांच्या मतांशी संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असं नाही.

आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010

ISSN - 2229-4929
**UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal**

# अनुक्रमाणिका


| अ. क्र | | पृ. क्र |
|---|---|---|
| 1 | कीर्तन परंपरा आणि बदलाचे स्वरूप<br>**डॉ. दत्तात्रय महादेव डांगे** | 1-3 |
| 2 | पोवाडा या प्रयोगरूप लोककलेचे बदलते स्वरूप<br>**डॉ. सोनू धोंडू लांडे** | 4-6 |
| 3 | विदर्भातील 'गंगासागर' या प्रयोगरूप लोकनाट्याचे बदलते स्वरूप<br>**प्रवीण सदानंद गायकर** | 7-9 |
| 4 | जागरण' या विधिनाटयाचे बदलते स्वरुप<br>**प्रा.डॉ. जवाहर मोरे** | 10-12 |
| 5 | जागरणाचे बदलते स्वरूप<br>**डॉ. नवनाथ विश्वनाथ पाटोळे** | 13-14 |
| 6 | पेशवेकालीन तमाशा (लोकनाट्य)<br>**प्रा. सुनील लक्ष्मण परदेशी** | 15-16 |
| 7 | दास्तांगोई : स्वरूप, इतिहास व वर्तमान<br>**डॉ. गीता मांजरेकर, प्रा. आशा कुंभार** | 17-21 |
| 8 | गोमंतकीय लोकनाट्य: पारंपरिक स्वरूप<br>**डॉ. सुनीता उम्रस्कर** | 22-24 |
| 9 | गोमंतकीय कुळमी जमातीचा 'शिगमा': स्वरूप, प्रकार आणि वाङ्मय<br>**प्रा.जयेश गावकर** | 25-30 |
| 10 | गोमंतकातील काणकोण तालुक्यातील 'काला': प्रयोग आणि बदलते स्वरूप<br>**प्रा. हेमंत अय्या** | 31-40 |
| 11 | 'कंसवध' या लोकगीतातील बदलता भाषिक अविष्कार<br>**डॉ. उज्ज्वला यशवंत सामंत** | 41-48 |
| 12 | संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील शाहीराचे योगदान<br>**अमृता रामसेवक मुखेकर** | 49-50 |
| 13 | खंडोबाचे जागरण : एक प्रयोगरूप लोककला<br>**प्रा.डॉ. जयकुमार चंदनशिवे** | 51-53 |
| 14 | मिथके आणि प्रायोगिक कलाविष्कार<br>**डॉ . संजय रमेश मेस्त्री** | 54-57 |
| 15 | प्रायोगिक लोककला आणि 'वाक'तत्त्व<br>**श्रीमती सूळ वैशाली मोहन, प्रा. डॉ. राजेंद्र खंदारे** | 58-60 |
| 16 | प्रयोगरूप लोककला - बदलते स्वरूप :'भारुड'<br>**सौ आश्लेषा सचिन कुंभार, प्रा. डॉ. दिलीप भिमराव गायकवाड** | 61-64 |
| 17 | आसाराम लोमटे यांच्या कथेतील अन्यायाचा प्रतिकार करणाऱ्या लढाऊ स्त्रिया<br>**संजय नामदेवराव आठवले** | 65-70 |

आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010
ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

# गोमंतकातील काणकोण तालुक्यातील 'काला': प्रयोग आणि बदलते स्वरूप

**प्रा. हेमंत अय्या**
मराठी अध्ययनशाखा, शणैं गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा, गोवा विद्यापीठ
**Email-** hemantaiya57@gmail.com

**प्रास्ताविक:-**

लोकसाहित्य ही एक अत्यंत व्यापक आणि संस्कृतीसामग्रीतील अविघटक अशी संकल्पना. मानवी उत्क्रांतीच्या अगदी प्रारंभीच्यादशेपासून आजतागायत या संकल्पनेत सतत भर पडत आहे. तद्वत लोकसाहित्य तेवढ्याच स्वाभाविकत: आपल्याला अवजड वाटणारी 'लोकसामग्री' आपल्या कक्षेतून दूर फेकतही आहे. एका कालखंडात अथवा स्थिर अवस्थेतेकडून या 'लोकसामग्री'च्या मार्गक्रमणाचा आढावा घेतला असता; त्यात होणारी स्थित्यंतरे आणि बदल सहज अभ्यासकांच्या नजरेत येतात. गोमंतकातील अगदी दक्षिणेकडचा काणकोण तालुका विविध लोकसाहित्य प्रकारांनी समृद्ध आणि संपन्न प्रांत होय. 'लोक'ची भौतिक संस्कृती, लोकवाङ्मय, प्रयोगसिद्धकला, मनोमयता आदी प्रकारांतील अफाट सामग्री येथील लोकजीवनाने स्वत:त समावून घेतलेली असून लोकनाट्यांचे काही अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण प्रकारही येथील लोकसामग्रीचा भाग ठरलेले आहेत. त्यापैकी 'कालो' हा एक प्रसिद्ध आणि वैशिष्ट्यपूर्ण लोकनाट्य प्रकार. सदर शोधनिबंधाद्वारे काणकोण तालुक्यातील संपन्न होणाऱ्या कालोत्सवाचे स्वरूप स्पष्ट करून त्यात होणाऱ्या बदलांची चिकित्सा अपेक्षित आहे.


**लोकसाहित्यातील लोकनाट्य**

लोकसाहित्यातील इतर मौखिक परंपरांपेक्षाही 'लोकनाट्य' ही अत्यंत पुरातन अशी 'लोक'ची अभिव्यक्ती होय. वर्तमानातील रंगभूमीचे मूळ लोकनाट्यात असल्याचे अगदी वैश्विक पातळीवरील बहुतांशी अभ्यासकांनी - संशोधकांनी मान्य केलेले आहे. लोकनाट्यांचा संबंध हा अनेकवेळा विधिनाट्याशी जोडला जात असल्याने लोकनाट्याला सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक असे त्रिविध स्वरूप प्राप्त झाल्याचे समजते.

'लोक'च्या अभिव्यक्तीचा सजीव असा आविष्कार म्हणून लोकनाट्याचा निर्देश होतो. त्याचे एक कारण म्हणजे अशा लोकनाट्याच्या लिखित संहिता नसतात. लोकनाट्यातील 'सवंग' अथवा 'पात्र' म्हणून रंगमच्यावर अथवा लोकमंचावर येणाऱ्या पात्रांना नाट्य'कथेला, विषयाला कुठवरून कुठपर्यंत न्यायचे' हे अवगत असते; आणि तसेच त्यांचे संवादही चालतात. अनेकवेळा हे संवाद वर्तमानातील स्थान, व्यक्ती, घटना, प्रसंग यावरही आधारलेले असतात. या अशा लोकनाट्यांद्वारे 'संज्ञापन' क्रिया घडते; असे मत लोकसाहित्यविशारद डॉक्टर विश्वनाथ शिंदे यांनी मांडलेले आहे. ते लिहितात, "लोकनाट्य म्हणजे प्रयोगरूप लोककला. ही सादर केली जाणारी कला. म्हणून नृत्य, संगीत, अभिनय, (नाट्य) आणि भाषा ही या कलेची मूलभूत अंगे होत. लोकनाट्याच्या या समग्र अंगांद्वारे संज्ञापन केले जाते."[1] म्हणूनच 'लोक'ची अत्यंत प्रयोगक्षम आणि सजीव अभिव्यक्ती म्हणून आणि लोकभाषेतील संज्ञापनशील लोकवाङ्मयप्रकार म्हणून लोकनाट्याचा निर्देश करावा लागतो. तद्वत लोकनाट्याचा अभ्यास हा भाषिक (शाब्द) आविष्करण आणि नाट्य सादरीकरण अशा दोन्ही अंगांनी होणे आवश्यक बनते. लोकनाट्यांसोबतच अन्य 'लोक'च्या प्रयोगक्षम आविष्करणांचे हे 'संशोधन वैशिष्ट्य' होय.

आर. एन. आय. फॉर इंडिया नवी दिल्ली
र. नं. - MAHMAR-36829-2010


ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal




**आकृती क्र 1 : प्रयोगरूप लोककलांचा अभ्यास आणि प्रकार**

**काणकोण तालुक्यातील लोकनाट्यांचे प्रकार**

गोमंतकातून अनेक नाटकाचे प्रकार आढळतात. पैकी काणकोण महालातील 'कालो' 'पेन्नी जागर', आणि 'खेळ' हे लोकनाट्यांचे दखल घेण्यायोग्य प्रकार होय. यातील 'पेन्नी जागर' हा मुखवट्यांच्या आधारे सादर होणारा प्रकार होय. 'खेळ' रंगमचीय लोकनाट्य प्रकार जो कर्नाटकमधील यक्षगानाच्या पद्धतीने काणकोण तालुक्यातील अगदी दक्षिणेकडील लोलयें, पैंगीण आणि कर्नाटकातील माजाळी, सदाशीवगड या भूपरिसरातून सादर होतो. तर दशावतारी लोकनाट्याला समांतर चालणारा 'कालो' (विशेषत: 'शंखासूर कालो') संवाद, गीत, मुकाभिनय, नृत्य यांच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या मधोमध आणि दैवतेसमोर साजरा होतो.




सर्वसाधारणत: मूळ दैवताच्या अगदी समोर हरदास आणि त्याच्या उजव्याबाजुला पकवाजवादक उभा. देवता आणि हरदास यांच्या मधोमध असलेली मोकळी जागा हाच या लोकनाट्य प्रकारातील पात्रांचा रंगमंच. या मोकळ्या जागेच्या दोन्हीबाजूस बसून प्रेक्षक कालोत्सवाचा आस्वाद घेत असतो. कार्तिक महिन्यापासून काणकोणात अनेक ठिकाणी, देवस्थानातून काल्यांना प्रारंभ होतो आणि कार्तिक महिन्याच्या अखेरपर्यंत काले होतात. काणकोणातील श्रीस्थळ, गावडोंगरी, अवें, पर्तगाळ, पैंगीण, खोल, निराकार देव माशें अशा ठिकाणी वर्तमानात काले होतात. 'कालोत्सव' म्हणून ह्या संपूर्ण उत्सवाचे निरिक्षण केल्यास 'फोवां कालो', 'शंखासुरा कालो' (रातकालो), 'मळणे कालो', 'गौळण कालो' अथवा 'धंय कालो' असे विविध प्रकार कालोत्सवातून संपन्न होत असतात. उपरोक्त सर्व प्रकार कालोत्सवातून वर्तमानातही आढळणारे एकमेव ठिकाण म्हणजे श्रीस्थळ काणकोण येथील मल्लिकार्जुन देवस्थान होय.

कालोत्सवातून आढळणारे सर्वच प्रकार उपरोक्त सर्व ठिकाणी आढळतातच असे नाही. दरएके ठिकाणी 'कालो' आपल्या स्थानिक वैशिष्ट्यांसह आकारास येता. गावडोंगरी, अवें येथून संपन्न होणारे 'काले' 'लोकधार्जिणे' तर इतर ठिकाणी

ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

संपन्न होणाऱ्या काल्यांना नाविन्याचा आणि नवनाट्य संकेतांचा स्पर्श झाल्याचे जाणवते. या कालोत्सवातील सर्वात महत्त्वाचा प्रकार म्हणजे 'शंखासूर कालो' हा होय.

1) माशें, पैंगीण, पर्तगाळ, या परिसरात फक्त 'शंखासूर कालो' सादर होतो.
2) खोतिगांव, गावडोंगरी या परिसरात 'शंखासूर' आणि 'मळणे कालो' हे प्रकार सादर होतात.
3) आणि फक्त श्रीस्थळ येथेच 'फोवां कालो', 'शंखासूर कालो', 'गौळण कालो', 'मळणे कालो' आणि 'धयं कालो' हे सर्व लोकनाट्य प्रकार सादर होतात. हे सर्व प्रकार सादर करण्यासाठी श्रीस्थळ येथे दोन दिवसांचा कालखंड घेतला जातो.

1) पहिला दिवस सकाळी - 'फोवां कालो', त्यानंतर 'आवळी भोजन'
2) पहिल्या दिवशी रात्री - ' शंखासूर कालो' आणि 'गौळण कालो'
3) दुसरा दिवस सकाळी - 'मळणे कालो' आणि 'धंय कालो'

अशा रितीने श्रीस्थळ काणकोण येथील श्री मल्लिकार्जुन देवस्थान येथे कालोत्सव संपन्न होतो.

**'शंखासूर' या नामाची पार्श्वभूमी आणि कथानक :**

**'ब्रह्मदेवाकडचे वेद चोरून नेऊन; काळयानदीतील एका शंखांत 'शंखासूर वेदांसकट जाऊन लपून बसला. ब्रह्मदेव आणि इतर देवतांनी हे वेद शंखासुराकडून परत आणण्याची जाबाबदारी श्री विष्णूवर सोपविली. शंखासुरांने चोरून नेलेले वेद परत मिळवून श्री विष्णूनीं शंखासुराचा वध केला.'** असा कथाभाग शंखासूर काल्यातून नाट्यरूपात सादर करायचो असतो. 'वेद चोरून शंखात जाऊन बसला तो 'शंखासूर' अशी या प्रकाराची नाम उत्पत्ती हरदास म्हणून काम करणारे अनेक लोककलाकार सांगतात. या संदर्भात गोमंतकीय लोकसाहित्यविशारद डॉ. पांडुरंग फळदेसाई लिहितात, "शंखासुरवधाचे कथानक ज्या काल्यांत आसा तो शंखासुरा कालो कृष्ण आनी गवळणींचें कथानक आसा तो गवळणकालो. दशावताराचीं कथानका घेवन करतात तो दशावतार कालो."[2] डॉ. फळदेसाईंचे सदर विधान दशावतारी काला आणि शंखासुर काला यातील फरकही टिपून जाते.

**'फोवां कालो'**

श्रीस्थळ येथे प्रतिपदेच्या दिवशी सकाळी सर्व महाजन, सेवाजन, कुलजन आणि भक्तजन हे लोक मल्लिकार्जुन देवाच्या परिसरात राजांगणांत एकत्र येतात. एक भली मोठ्ठी 'कडात्तर' सभामंडपांत अंथरून त्यावर पोहे कालविण्याचे काम सुरू होते. पन्नास - साठ वर्षाअगोदर या दिवशी १२ खंडी पोहे कालविले जायचे अशी माहिती येथील वयोवृद्ध **"१२ खंडी फोव, भांगरा(चें) खोरें आणि चांद्ये(च्या) दावलान कालयताले आणि फोवां काल(लो) जातालो."** अशी माहिती पुरवितात.

पोहे कालविण्याचे काम सुरू झाल्यानंतर 'हरीदास' अथवा 'हरदास' आणि पकवाज वादक राजांगणात प्रवेश करतात. हरदास हातांत ताळ घेऊन मुखाने भजन गातो. भजन संपवून गणेश वंदना करतो. हरदासाची गणेश वंदना सुरू असतेना 'कुड्ड्याची' अथवा 'कुड्डम्हारू' सभामंडपात आपला खेळ दाखवून जातात.

कुड्डमाची मागोमाग गणपतीचे आगमन होते. या गणपतीची पूजा करण्यासाठी ब्राह्मण अथवा 'भट' येतात. या ब्राह्मणांचा आणि हरदासाचा मजेशीर संवाद होतो. हरदास आणि ब्राह्मण यांच्यातील संवादाने जमावाचे मनोरंजन होते आणि सध्याकाळी 'शंखासूर कालो' संपन्न होणार असल्याचे समजते. गणेशपुजेसाठी आलेले ब्राह्मण बाजुला कालविलेल्या पोह्यांचा गणपतीला नैवेद्य दाखवितात. गणपतीनंतर सरस्वतीचा प्रवेश होतो आणि **'फोवां काल्या'**ची सांगता होते. गोमंतकात दिवाळी सणाचा खाद्यप्रदार्थ म्हणून पोह्यांना महत्त्व आहे. भात शेती करणारा बहुतांशी काणकोण परिसरातील शेतकरी आपल्याच शेतात पिकलेल्या धान्यापासून पोहे बनवून आणतो. काणकोणात दिवाळसणाअगोदर पोहे खाल्ले जात नाहीत.

ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

**'वनभोजन'/ 'आंवळी भोजन' / 'आवांळ्याकडे'**

काणकोण तालुक्यातील इतर कालोत्सवांची सुरुवात 'वनभोजनाच्या' अथवा 'आंवळी भोजना'च्या विधीने होते. काणकोणातील तिन्ही मल्लिकार्जुनाच्या ठिकाणी संपन्न होणाऱ्या वनभोजन विधीस 'आंवळी भोजन' अथवा 'आवांळ्याकडे' असे संबोधले जाते. तर पैंगीण, पर्तगाळ येथे 'वनभोजन' असाच शब्दप्रयोग होताना आढळतो. देवालयापासून दुरवर असलेल्या ठिकाणी श्री मल्लिकार्जुनाची पालखी जाते. तेथे वनभोजन संपन्न होते व तद्नंतर संध्याकाळच्यावेळी भजन, लोकगीते यांच्या धुंदीत श्री मल्लिकार्जुनाची पालखी पुन्हा देवस्थानी आणली जाते.

**शंखासुरा कालो**

कालोत्सवातील सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे 'शंखासूर कालो.' सदर लोकनाट्य ज्या ज्या ठिकाणी सादर होते त्या त्या ठिकाणी देवालयातून अनेक लाकडी मुखवटे आणि शंखासुराचा कपड्याचो वेष बाळगलेला असतो. काल्यांच्या ठिकाणी या मुखवट्यांची संख्या कमी – अधिक असते. काही ठिकाणी 'जागर' लोकनाट्यातील मुखवटेही या प्रकारात घुसडले गेल्याचे स्पष्ट होते.

**शंखासूर काल्यातून वापरले जाणारे विविध मुखवटे आणि वेश**

1) गणपती
2) 'कुडुम्हारू', अथवा 'कुडुमाची' या नावाचे दोन मुखवटे,
3) पुतना
4) श्री. विष्णू देवाची लाकडी मुर्ती.
5) लाकडी 'मोर' अथवा मोराचा मुखवटो
6) शंखासुराचा कापडाचा मुखवटा आणि काळ्यार रंगाचा वेश

कालोत्सवांतल्या प्रत्यक्ष लोकनाट्याची सुरुवात होण्याआदी गणपतीच्या मुखवट्यासोबत इतर मुखवट्यांचीही हरदास आणि काटकार मिळून पूजा करतात. बऱ्याच ठिकाणी ही पुजा झाल्याझाल्या कोण व्यक्ती कोणते पात्र साकारणार हे ठरते. अशा पद्धतीने प्रत्यक्ष शंखासूर काल्याची सुरूवात होते.

**हरदास :** **वक्रतुंड महाकाय सुर्यकोटी समप्रभ |**
**निर्विघ्नंकुरुमेदेव सर्वकार्येशुसर्वदा ||**
**या कुंदेंदु तुषार हार धवला या शुभ्र वस्त्रव्रता |**
**या वीणा वरा दंडमंडित करा या श्वेत पद्मासना ||**
**या ब्रह्मच्युत शंकरा प्रभुतिभी देवी सदा वन्दिता |**
**सामा पातु सरस्वती भगवती निशेश्य जाड्या पहा ||**
**प्रारंभी विनंती करू गणपती; विद्यादया सागरा**
**अज्ञानत्व हरोनी बुद्धीमती दे आराध्य मोरेश्वरा**

या प्रार्थनेनंतर हरदास गणेश स्थवनाला सुरवात करतो.

**विघ्न विनाशन नमन माझे, गणेशा चरणी गणेशा चरणी**
**हीत चित्त मनोभावे सोडूनी पाणी;**
**नमन गौरीसुता; ठेवोनिया माथा**
**ठेवोनिया माथा**

ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

**'कुड्डमाची'**

हरदासी गणेश आराधना सुरू असतानाच **'कुड्डमाची'** नावांची दोन पात्रे प्रेक्षकातून वाट काढत काढत मध्ये येऊन नाचू लागतात. शंखासूर काल्यातील दरएका पात्राची आपली अशी खास नृत्य लकब असते. जो कलाकार आपल्या आंगिक अभिनयाद्वारे प्रेक्षकांचे जास्तीत जास्त मनोरंजन करतो; त्याचीच भूमिका कालोत्सवातून रंगत असते. एकमेकांच्या खांद्यावर हात टाकून ही दोन्ही पात्रे रंगमंच्याच्या मधोमध नाचतात. ह्या नाचातच दोघांचेही फिस्कटते व भांडण सुरू होते. या दोन्ही पात्रांच्या हातात एक कापडाचो 'वेट' असतो. त्यांच्या भांडणादरम्यान ते वेटांनी एकमेकांक मारतात. पहिला 'कुड्ड्माची' दुसऱ्याला मारतो आणि पळत जाऊन प्रेक्षकांत जाऊन लपतो. या कुड्डमाचींचा खेळ २० – २५ मिनिटे चालतो. या खेळाचो आनंद प्रेक्षक लुटतात आणि तेवढ्यात हरदास पुन्हा गणेश वंदनेला सुरूवात करतो.

**गणपती**

गणपतीचा मुखवटा, लांबसर धोतर, खांद्यावर शेला व गळयात झेंडूची फुले परिधान केलेला गजानन रंगमंचावर समोरून प्रवेश करतो. दोन्ही कुड्डमाची भयभीत झाल्याच्या हालचाली करतात व गणपतीचे आगमन झाल्याचे पाहून रंगमंचावरून पळतात.

**हरदास :** **जय जय जय जय करीती मोरया**
**मंगल दायक सुखकर दायक**

गणेश नृत्याचीही वेगळी लकब असते. साधारणतः गावातील स्तूल व अंगाने जड असलेला माणूस हे पात्र रंगवितो. गणेश आपल्या गजगती चालीत नृत्य करत रंगमंचाला तीन फेरे मारून हरदासाजवळ ठेवलेल्या खूर्चीवर आसनस्थ होतो.

आता ब्राह्मणांचे टोळके रंगमंचावर प्रवेश करते. हे ब्राह्मण काही खरेखुरे ब्राह्मण नसतात. ब्राह्मणांची जणू टर उडविण्यासाठी हे लोक आलेले असतात. ते गात असलेली गीते, त्यांचे संवादही असेच विडंबनात्मक असतात. असे संवादात्मक नाट्य जमलेल्या प्रेक्षकांचे भरपूर मनोरंजन करते, या ब्राह्मणांच्या टोळक्याने कसलातरी मळकट असा पंचा न्हेसलेला असतो, केळीच्या दोरांचे जानवे अंगात घातलेले असते. मुख्य म्हणजे या भूमिका करणाऱ्या व्यक्ती या अगदी पोरकट वाटाव्या अशाच असतात. साधारणतः १० - १२ वर्षांची पाच – सहा मुले व त्यांच्याबरोबर हरदासाशी संवाद करण्यासाठी एक – दोन वयस्क पुरुष अशी ही ब्राह्मणांची टोळी असते. इथवरून पात्रांदरम्यानच्या नाट्य संवादास सुरुवात होते. हरदासी संवाद शुद्ध मराठीत असतात तर शंखासूर काल्यातील इतर पात्रे लोकभाषा कोंकणीत संवाद साधत असतात.

**हरदास :** **अरे अरे कोण तुम्ही? आणि इथे का आलात?**
**ब्राह्मण :** **आमी कोण? तूं आमकां वळखना?**
**हरदास :** **नाही मी तुम्हाला ओळखलं नाही?**
**ब्राह्मण :** **आमी कोण ते सांगू?**
**हरदास :** **हो सांगा ना ?**
**ब्राह्मण :** **सांगू मरे ? आयक तर... (असे म्हणून पुढील गीत म्हणू लागतात)**
**ब्राह्मण :** **आमी जातीचे बारामण; सोयरे दायरे आमचे मुसलमान**
**स्नान संध्या सोडून दिली; आमी बाटलेची सोयरीक केली.**
**हरदास :** **हां म्हणूनजे तुम्ही ब्राह्मण आहात. मग इकडे का आलात?**
**ब्राह्मण :** **हांग कित्या आयलात? तूं आणि किते रे? बारामण न्ही आमी पूज करपा आयलात.**
**हरदास :** **हां म्हणूनजे तुम्ही पूजा करायला आलेले आहात? पण तुम्ही आंघोळ केली का?**

ISSN - 2229-4929
**UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal**

**ब्राह्मण :** **आंगूळ? आंगूळ म्हटल्यार?**

**हरदास :** **आंघोळ म्हणूनजे स्नान... पाण्याने अंग धुवणे...**

**ब्राह्मण :** **आं इतलें मरे...** (म्हणून सोबत आणलेल्या घंटेने आंघोळीचा अभिनय करतात) **जालें मरे समाधान ?**

**हरदास :** **हो... हो झाले? पण तुमचे यज्ञोपवित कुठे ?**

**ब्राह्मण :** **कितें? यज्ञोपवित ?? ही आणि कितें नवी भानगड?**

**हरदास :** **अरे यज्ञोपवित म्हळयार जानवे.**

**ब्राह्मण :** **आं जानवें रे? दोळे फुटला काय रे? हें न्ही रे ?** (असे म्हणून ब्राह्मण, केळीच्या गाब्याचें यज्ञोपवित वर काडून दाखवतात)

(हरदास या अशा ब्राह्मणांकरवी गणपतीची पूजा करून घेतो. या गणपतीला फुले वाहिली जातात. त्यानंतर अगरबत्तींची ओवाळणी करून एखाद्या फळाचा नैवेद्य गणपतीला दाखिविला जातो. त्यानंतर ब्राह्मण आणि हरदास मिळून गणपतीची 'सुखकर्ता दुखहर्ता' ही आरती गातात. या आरती गायनानंतर हे ब्राह्मण हरदासापाशी दक्षिणा मागतात.)

**ब्राह्मण :** **जाली मरे पूजा आतां दी दक्षिणा. सकाळींय दिली ना तुवें...**

**हरदास :** **आत्ता इथे कुठे दक्षिणा... दक्षिणा उद्या...**

**ब्राह्मण :** **फाल्यां? फाल्यां खंय?**

हरदास एखाद्या जागेचे नाव सांगून मोकळा होतो. हरदासाकडून दक्षिणा देण्याचे वचन घेऊन ब्राह्मण आपल्या हातातील घंटा वाजवत निघून जातात. (पैंगीण परिसरातील काल्यात ब्राह्मण निघत असताना म्हातारीचे पात्र येते.) हरदास पुन्हा गणेश स्तुतीला सुरुवात करतो.

**हरदास :** **भावेसी मोदक अर्पूं गणनाथा**
**भावी विनायक पूजा करी**

मागोमाग सभेला एक प्रदक्षिणा घालून गणेशही निघतो. शंखासूर काल्यात त्यानंतर बऱ्याच ठिकाणी **मोर** नाचविला जातो. एका पुरूषालाच साडी चोळी न्हेसवून त्याच्या पोटावर मोराचा मुखवटा बांधला जातो. हा मोर म्हणजे शारदा होय. मोराचे नृत्य सौम्य व नाजूक असते. उजव्या हाताने पोटावर बांधलेला मुखवटा पकडून दाव्या हाताने शारदेचा अभिनय करणारा साडीचा पदर फिरवित असतो. हा मुखवटा जरी मोराचा असला तरीही मोर जिचे वाहान आहे, त्या **शारदे**चे हे आगमन असते. देवी सरस्वतीची स्तुती गाणारी गीते यावेळी हरदासाच्या मुखात असतात.

**हरदास : (सरस्वती स्थवन)** रंगमंच्याचा एक फेरा घेऊन सरस्वती निघून जाते.

त्यानंतर हरदास शंखासूर येत असल्याचे लोकांना सांगतो.

**हरदास : शंखासुरा रे महाविरा...** (असे गीत हरदास गातो.)

मंदिराच्या मागच्या बाजूने शंखासूर सभेत प्रवेश करतो. प्रेक्षकांमध्ये असलेल्या लोकांवर आपल्या हातात असलेल्या फांद्या तो आपटतो. आकांत तांडवी नृत्य करतो. हा शंखासुर काल्याच्या या प्रारंभीच्या भागात मुका असतो, त्याला वाचा नसते. तरीही वाचा नसलेला शंखासूर सभामंडपात बराच धुमाकूळ घालतो. सभामंडपात दोन चार फेऱ्या टाकल्यानंतर तो पकवाज वादकाचे हात पकडतो आणि त्याचे वादन थांबवितो. हीच गोष्ट हरदासाच्या बाबतीतही करतो आणि हरदासाला ताळ वाजविण्यापासून अडवितो. आणि दोघांचेही हात घट्ट बांधून ठेवल्याचा अभिनय करतो. त्यानंतर एक माणूस हातात दिवटी (मशाल) घेऊन शंखासूरापुढे येतो. याचा उल्लेख लोकभाषेत दिवटीकार असा होतो. शंखासूर अभिनयानेच दिवटीकाराला जवळ बोलावतो.

**दिवटीकार : म्हाका आपयता?**

**शंखासूर : (शंखासूर दिवटीकाराला ये, ये असा इशारा करतो )**

**दिवटीकार : म्हाका आनी कित्या आपयता रे हो? कित रे? कित जालां? कोण तू?**

असा दिवटीकार शंखासूराला प्रश्न विचारतो. शंखासुर त्याच्या खांद्यावर हात घालून त्याला आपल्याप्रमाणे नृत्य करण्यास सांगतो. **'हो पांय फुडें घाल म्हण्टा'**, **'तो पांय फुडे घाल म्हण्टा'** असे करत करत तो शंखासुराप्रमाणे तालात नाचू लागतो. हे करत असताना शंखासूर बऱ्याच ठिकाणी त्याला हातातील फांद्यांनी पिटत असतो. हा भाग अत्यंत मनोरंजक ठरतो. त्यानंतर हरदास आणि शंखासुराचा संवाद सुरू होतो.

शेवटी पुतना सभामंडपात प्रवेश करते. एका सुंदरीचा मुखवटा एका पुरूषाने धारण केलेला असतो. नववारी साडी, अगदी पुढे आलेली छाती, सुंदर मुखवटा आणि एका अगदी सुंदर स्त्रीप्रमाणे डोलत डोलत पुतना सभामंडपात प्रवेश करते. शंखासूराप्रमाणे पुतनाही मुकीच असते. प्रेक्षकातील कोणत्याही पुरूषाला ती जागची उठवते आणि त्याच्याबरोबर नृत्य करते. शेवटी विष्णूची मूर्ती आपल्या छातीला लावते. मूर्ती छातीला लावून काही वेळाने ती आकांत तांडव करत, ओरडत ओरडत सभेतून पळून जाते. तिच्या मागोमाग सभेतील दोन पुरुष पळतात व बाहेर येताना तीच विष्णूची मूर्ती एका कपड्याच्या पाळण्यात दोन्ही टोकाला पकडून झुलवत सभामंडपात आणतात. पुतना नृत्य आणि पुतनावध हा दहीकाल्याचा भाग आहे. जो शंकासुर काल्यातच सामावलेला पाहता येतो.

काल्यातील नाट्यभागाची तालिम अथवा पूर्वतयारी केली जात नाही. लोकसांस्कृतिक शंखासूर काल्याची संहिताही उपलब्ध नसते. काल्याच्या रात्रीच कोणी कोणती भूमिका बजावायची हे ठरते. त्याकारणाने मागच्या वर्षीच्या शंखासूराप्रमाणेच यंदाचा शंखासूर होईल किंवा तसेच संवाद तो आपल्या संभाषणात वापरेल; असे निश्चितपणे सांगता येत नाही. असे असले तरीही पात्रांचे प्रवेश, त्यांचे नृत्य, त्यांचे वागणे, पोषाख पद्धती आदींचे स्वरूप मात्र बदलत नसते. "लोकनाट्यातील अभिनयाचा विचार करताना लोकनाट्याचा प्रवास विधीनाट्यांकडून लोकनाट्यांकडे झाला आहे हे प्रथमत: लक्षात घ्यावे लागते. लोकसाहित्यामध्ये लोकनाट्याचा विचार फारच अल्प प्रमाणात झालेला आहे. जेव्हा केव्हा लोकनाट्याचा विचार झाला, तेव्हा तो विधी, उत्सव अथवा सण महोत्सवातील एक प्रयोग एवढ्यापुरताच मर्यादित राहिला. लोकनाट्याचे स्वत:चे असे वैशिष्ट्य आहे जे विधी, सण, उत्सवातील प्रयोगांमध्ये नाही. लोकनाट्यही एक विकसित झालेली रंगमंचीय यंत्रणा आहे."[3] हे प्रकाश खांडगे यांचे मत शंखासूर कालो या लोकनाट्याचा विचार केल्यास पटते.

**मळणे शंखासूर (मळणे कालो)**

मळणे कालो अथवा मळणे शंखासूर हा लोकनाट्याचा प्रकार केवळ मल्लिकार्जुनाशी संबंधित लोकसमाजातूनच आढळतो. खोतिगांव, गावडोंगरी या परिसरात हा लोकनाट्य प्रकार शंखासूर काल्यानंतर लगेच होतो. तर श्रीस्थळ येथे मात्र शंखासूर काला झाल्यानंतर दुसऱ्या सकाळी गौळण काला आणि दही काल्या अगोदर हा प्रकार सादर होतो. भातशेतीच्या 'मळणी' या प्रकाराचे नाट्यात्म सादरीकरण हे या प्रकाराचे वैशिष्ट्य होय. या तालुक्यातील शेती प्रधान जीवनपद्धती आणि ग्रामव्यवस्थेतील बारकाव्यांवर प्रकाश टाकणारा हा लोकनाट्य प्रकार होय. जो गोमंतकात इतरत्र होणाऱ्या कालोत्सवांचा भाग नसून तो केवळ काणकोण तालुक्यातूनच आढळतो. शंखासूर काल्याचा पुढचा भाग म्हणून सादर होत असल्याने या प्रकारात 'गण' होत नाही. श्रीस्थळ येथेही पकवाज व हरदास यांच्या मागोमाग सरळ शंखासूर प्रवेश करतो.

**शंखासूर : पिकला हां बरे पिकला. कापपूय बरें जाला आत हें मळपा नाका.**

**हरदास : हय हय. करता मरे जाल्या(र) मळणी? पयलीं बरी मेढ सोद पळोवयां**

**शंखासूर :** (शंखासूर एखाद्या इसमास आणून मेढ पुरिल्याचा अभिनय करतो)

**हरदास :** **मेढ बरी जाल तुगेली आं. आतां बरे बैल सोद पळवयां.**

**शंखासूर :** **बैल आणि जाय न्ही?** (असे म्हणून शंखासूर बैल शोधतो)

**हरदास :** **बरें आसा... आत करत मरे मळणी?**

**शंखासूर :** **हयै हयै, आरारारा**

**हरदास :** **आं जालें आं जालें. मळण जालें. आतां बैलां सोडट्टा मरे?**

**शंखासूर :** (शंखासूर एक एक करून बैलांना सोडतो. बैल परत मस्ती करतात. हातातल्या डाहाळ्यांनी शंखासूर बैलांना पिटतो)

**हरदास :** **बरे मस्ती आं बैल...** (बैलांक सोडवन जाले उपरांत) **आत वाऱ्या लावयां मरे?**

**शंखासूर :** (मळलेले भात वाऱ्याला देण्याचा अभिनय शंखासूर साकारतो) **जालें.**

**हरदास :** **जालें बरे बेगीन जालें मरे, वारें बरें आशी दिसता... आं चल आत स्थान वाटणीं करयां मरे?**

**शंखासूर :** **हय ... मेजतां आं. तीन कट्य्यो रोयल्यो तीन कव्यो पीकल्यो.** (हांगासरल्या शंखासुराची चालाखी दिसते. सर्व धान्य वाटूनही जास्तीत जास्त धान्याचा भाग आपल्यापाशी शिल्लक ठेवावा असा त्याचा प्रयत्न असते. शंखासूराची स्थान वाटणी सुरू होतो. वाटा कुणाकुणाचा काढावा हाची हरदास त्याला आठवण करून देतो.)

**शंखासूर :** **हें वयल्या पुर्वांक. बाबो. हेपय तुका हांगा दवरला.**

**शंखासूर :** **आतां पुरोयत. बाक्रे आणि प्रेमानंद भट. बाक्रे काडट्टा आणि प्रेमानंदाचेर मारता; आणि प्रेमानंदा काण्ण बाक्रेचेर मारत.**

**शंखासूर :** **आत पूजारी. मनोहर आणि दत्तगुरू. दत्तगुरू काड्ट्टा आणि मनोहराचेर मारता. मनोहरा काडट्टा आणि दत्तगुरूचेर मारतां**

**शंखासूर :** **आतां मुकदम.**

**हरदास :** **त्याक सारकें जाऊं दी मुकदमांक.**

**शंखासूर :** **आतां हरदास आणि मृदंगी. मोहन आणि उमेश. मोहना काडट्टां आणि उमेशाचेर मारतां, आणि उमेशा काण्ण मोहनाचेर मारतां**

अश्यो तरेंन शेनाय वादक, सूर्त वादक, काटकार, वेळीप, गांवकार, मडवळ, सेवेकरी अशा सगल्याचो स्थान वाटो काडून. उरिल्या धानाची दर करपाची असते. शंखासूर पळोवप्यांतल्या एका मनशाक आफयता.

**शंखासूर : हें पळय इतलें उरला माप म्हागेलें दर तुगेली. (असे संभाषण करून सावकारालाही फसवतो.)**

मळणे काल्याच्या शेवटच्या भागात विष्णूरूपी एका लहान मुलाला शंखासूर खांद्यावर बसवून नाचवितो. नंतर तो घाबरून रंगमच्यावरून पळतो. बाळकृष्णाच्या हातून संकासूराचा वध झाल्याचे कथानक इथे सादर झालेले असते.

शंखासूर काल्याची जवळीक दशावतार आणि नृत्यपद्धती कर्नाटकातील यक्षगानाशी समांतर आहे. परंतु 'मळणे शंखासूर' हा प्रकार म्हणजे खास काणकोण तालुक्यातील शेतकरी, कष्टकरी 'लोक'चे सांस्कृतिक जीवन रंगविणारे लोकनाट्य होय. म्हणूनच या प्रकारात हरदासी संवादही लोकभाषेतून होतात. पुन्हा हरदासाचा कल महाजन, सेवाजन, कुलजन, पुरोहीत, काटकार, मुकादम, वेळीप, मडवळ अशा सर्वांचा 'थळावांटो' संकासूराकडून काढण्याकडे असतो. येथील लोकव्यवस्थेतील, ग्रामव्यवस्थेतील विविध हुद्दे आणि स्थरांची कल्पनाही या लोकनाट्य प्रकारातून होते.

खोतिगांव, गावडोंगरी येथील कालोत्सवाचा शंखासूराचा बालकृष्णाने केलेला वध हा शेवट असतो. परंतु श्रीस्थळ येथे त्यानंतर गौळण काला सादर होतो. तर येथील कालोत्स्वाची सांगता ही दही काल्याने (दही हंडी) होते. माशें, पैंगीण, पर्तगाळ,

ISSN - 2229-4929
UGC CARE Listed (Group -I) Peer Reviewed Journal

7) कोंकणातला 'दशावतार' आणि गोव्यातील 'शंखासुर कालो' यातील 'कुड्डमाची' हे पात्र म्हणजे अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आणि दखलघेण्यायोग्य भेद होय.

8) दशावतारी लोकनाट्यांत 'कुड्डमाची' हा प्रकार नाही. तर गोवाच्या कालोत्सवात 'बिलीमारो' हा प्रकार आढळत नाही हा नोंद घेण्यायोग्य तुलनात्मक भेद होय.

9) 'मळणे शंखासूर' हे खास काणकोण तालुक्यातील शेती प्रधान लोकांचे लोकनाट्य होय. काणकोणची ग्रामव्यवस्था आणि लोकसंस्कृती यांना लोकनाट्यरूप प्राप्त झालेला हा एकमेव लोकसाहित्य प्रकार होय.

10) आधुनिकीकरण, यांत्रिकरण, नागरीकरण, माहिती तंत्रज्ञान यांना लाभलेली उंची दिवसेंन दिवस लोकसाहित्य सामग्रीवर परिणाम करत आहे. लोकसाहित्य, प्रयोगसिद्ध कला, लोकनाट्य आदींच्या संवर्धनासाठी संशोधक वृत्तीन लोकसाहित्य संशोधनाच्या क्षेत्राकडे पाहणे आवश्यक ठरलेले आहे.

11) लोकसाहित्यातून घडणारे अनेक बदल हे लोकसाहित्याच्या सजिवत्त्वाला कारणीभूत ठरतात.

12) लोकसाहित्याच्या विविध प्रकारातून घडणारे बदल गर्भीय तत्त्व अथवा मुलतत्त्वीय गाभा बदलत नसताना वरवर घडणारे बदल असतात.

**संदर्भ**

---

[1] शिंदे विश्वनाथ - 'लोकसाहित्यमीमांसा - भाग दुसरा', स्नेहवर्धन, पुणे, २००६, पृ. २७१.

[2] फळदेसाई पांडुरंग – 'गोंयच्या लोकवेदाचें सौंदर्यशास्त्र' सासाय प्रकाशन, पर्वरी – गोंय, पयली आवृत्ती 2017, पृ.154

[3] खांडगे प्रकाश – 'महाराष्ट्राच्या प्रयोगात्मक लोककता – परंपरा आणि नवता', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती २०१७.

**संदर्भग्रंथ :-**

1) केरकर राजेंद्र पांडुरंग – 'गोमंतकाची सांस्कृतिक संचिते', गोवा सरकार, कला व संस्कृती संचालनालय, 2005.
2) खांडगे प्रकाश – 'महाराष्ट्राच्या प्रयोगात्मक लोककता – परंपरा आणि नवता', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती २०१७.
3) खेडेकर विनायक विष्णू - 'गोवा कुणबी : पर्यावरण संस्कृतीचे जनक, रक्षक', संपर्क माध्यम, फेब्रुवारी 2004.
4) खेडेकर विनायक विष्णू - 'गोवा संस्कृतिबंध', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, 2012.
5) खेडेकर विनायक विष्णू - 'लोकसरिता : गोमंतकीय जनजीवनाचा समग्र अभ्यास', कला अकादमी गोवा, मार्च 1993.
6) नायक जयंती – 'लोकवेद विमर्श', गोवा कोंकणी अकादमी, पयली उजवाडावणी 2020.
7) फळदेसाई पांडुरंग – 'गोंयच्या लोकवेदाचें सौंदर्यशास्त्र' सासाय प्रकाशन, पर्वरी – गोंय, पयली आवृत्ती 2017
8) शिंदे विश्वनाथ - 'लोकसाहित्यमीमांसा - भाग दुसरा', स्नेहवर्धन, पुणे, २००६.